अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेली मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून श्री रामकृष्ण परमहंस कॉलेज ऑफ फार्मसी (डी फार्मसी) या संस्थेस बी फार्मसी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम-२०१९/प्र.क्र.२८७/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : २६ ऑगस्ट,२०१९

<u>वाचा</u> : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No. Western/१-४२५९५०५४६४/EOA/Corrigendum-१ दि. ९ऑगस्ट१०१९,
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/२०१९/११५४, दिनांक २० ऑगस्ट,२०१९

प्रस्तावना :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये मिळालेल्या मान्यतेच्या अधिन राहून संचालक, तंत्र शिक्षण यांनी त्यांच्या संदर्भ २) येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे, श्री रामकृष्ण परमहंस कॉलेज ऑफ फार्मसी (डी फार्मसी) या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी फार्मसी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून श्री रामकृष्ण परमहंस कॉलेज ऑफ फार्मसी (डी फार्मसी) या संस्थेत बी फार्मसी अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचा डिटीई संकेतांक, नाव व पत्ता	अभ्यासमाचे नांव	प्रवेश क्षमता
१	२५८० - परीवर्तन ग्रामीण विकास महिला व शिक्षण मंडळाचे, श्री रामकृष्ण परमहंस कॉलेज ऑफ फार्मसी (डी.फार्मसी) प्लॉट नं. ७३, गट नं. ८, एनएच २२२, पाथरी रोड, हसनपूर, परभणी ४३१ ४०१	बी. फार्मसी	६०

२. सदर संस्थेस खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

९) तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

१०) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

११) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये या संस्थेमधील औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपुष्टात आल्यानंतर संस्था स्तरावर होत असल्याने हे प्रवेश नियमानुसार व गुणवत्तेनुसार करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

१२) तसेच संस्था स्तरावर होणाऱ्या प्रवेशासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचे लाभ विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत.

१३) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८२६१५११३४७९०८ असा आहे.

हा आदेश महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.08.30 16:13:31 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
३. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५. प्राचार्य, श्री रामकृष्ण परमहंस कॉलेज ऑफ फार्मसी (डी.फार्मसी) प्लॉट नं. ७३, गट नं. ८, एनएच २२२, पाथरी रोड, हसनपूर, परभणी ४३१ ४०१५.
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
७. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवडनस्ती/तांशि-४.